ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
July – December 2021- Vol. 10 No. 2

# संत नामदेवांच्या अभंगरचनेतील कृषिविषयक जाणिवा

**प्रा. डॉ.ज्ञानबा महादू गाडे**
*विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालय,*
*हिवरा आश्रम, ता मेहकर, जि.बुलढाणा*

**प्रस्तावना:**

संत ज्ञानेश्वर,संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम,संत रामदास,व इतर सर्व संतमंडळी यांचा जन्म ग्रामीण भागात झाला. या सर्वांचे कार्यक्षेत्र ग्रामीण भाग हेच राहिले आहे. निसर्ग आणि शेतीक्षेत्रातील संदर्भ या सर्वच संतांच्या रचनेमध्ये कमी-अधिक प्रमाणात आढळून येतात.एखादा सिद्धांत पटवून देण्यासाठी सर्व संत कृषिक्षेत्रातील दृष्टांत देतात. आपला भारत देश हा कृषिप्रधान देश आहे.तेराव्या शतकात बहुतांश जनता कृषिसंबंधित असलेली पाहायला मिळते.कृषिशीसंबंधित क्षेत्रातील जनतेला यांच्या क्षेत्राशी संबंधित दाखले देऊन त्यांना अवघड असे तत्त्वज्ञान सोप्या भाषेत पटवून देण्याचा प्रयत्न सर्वच संतांनी केलेला आढळून येतो.संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम महाराजांच्या साहित्यामध्ये निसर्ग आणि कृषिविषयक संदर्भ अधिक प्रमाणात आढळून येतात.त्या तुलनेत संत नामदेव महाराज यांच्या अभंगरचनेत कृषिविषय संदर्भ अल्प प्रमाणात आढळून येतात.

**उद्दिष्टे:**

संत साहित्याची व्याप्ती अतिशय व्यापक आहे.संत नामदेव महाराजांचे अभंग ही विपुल प्रमाणात आहेत. संत नामदेव महाराजांच्या अभंगरचनेत असंख्य विषय येत जातात.कृषिविषयक संदर्भांचे काही ठिकाणी दर्शन घडते. हे कृषिविषयक संदर्भ येण्या पाठीमागची भूमिका लक्षात घेणे गरजेचे आहे.अवघड असे तत्वज्ञान अपरिचित अशा दृष्टांत माध्यमातून लोकांना पटवून देणे हा उद्देश दिसून येतो.लोकांना कृषी संस्कृतीचा परिचय असल्याने अध्यात्मिक विचार आकलन होण्यास मदत झाली आहे.दृष्टांताकडून सिद्धांताकडे विचार करण्यास बराच वाव दिसून येतो,हे नव्याने लक्षात घेण्या ची गरज आहे. संत नामदेव महाराजांचा जन्म मराठवाड्यातील हिंगोली जिल्ह्यातील नरसी बामणी येथे झाला. येथील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हाच आहे.संत नामदेव महाराजांचा जन्म शिंपी कुटुंबात झाला.संत नामदेवांच्या अभंगरचनेत त्यांच्या शिंपी या व्यवसायाबरोबरच कृषी संस्कृतीशी निगडित काही ठिकाणी संदर्भ आढळून येतात.

संत नामदेव महाराजांना अध्यात्मिक विचार सर्वसामान्यांच्या जेव्हा गळी उतरवायचा आहे. तेव्हा त्यांच्या अभंगरचनेत कृषिशीसंबंधित जाणिवा आढळून येतात.संत नामदेव हे विठ्ठलाचे लडिवाळ भक्त.संत नामदेव हेच विठ्ठलमय झाले नव्हते;तर श्रीविठ्ठल हे नामदेव मय झाले होते. विठ्ठलाला नामदेव महाराजांचा विरह सहन होत नव्हता.संत नामदेव महाराज विठ्ठलाशी इतके एकरूप झाले होते की,विठ्ठलालाच नामदेवाची ओढ लागली.आत्मज्ञान प्राप्ती झाल्यानंतर त्यांना सर्वत्र विठ्ठलाचे दर्शन घडत होते.भक्तीचे वर्णन करताना संत नामदेव कृषी संस्कृतीचे दर्शन घडवितात. नामदेव महाराजांनी शेतीवरील अतिशय सुंदर रूपक वापरले आहे.संत नामदेव महाराज म्हणतात,

*तुझ्या माझ्या शेता नाही पेंडवळा | दावियेला डोळा पांडुरंग ||१||*
*कल्पनेची पेंडी पाप कुंदा काढी |काशा देशोधडी लावियेल्या ||२||*
*त्रिगुणी त्रिफनी धरूनी सूत्रधारी| वेद बैल चारी जुंपियेले ||३||*
*अनाथाचे शेत प्रेमाचा हेलावा | शेत राखे देवा पांडुरंगा ||४||*
*ब्रह्म नामबीजे बांधुनिया ओटी | पेरी दाटोदाटी नामदेव||५||*
*अ.क्र १७४९*

नामदेव महाराज म्हणतात, हे विठ्ठला तुझ्या आणि माझ्या शेताला पेंडवळा नाही,बांध नाही.दोघांचे शेत एकच आहे.तुझ्या व माझ्या स्वरूपात कोणताही भेद नाही.याचा अनुभव तू माझ्या डोळ्यांना दिला.पापरुपी गवत काढून कल्पनारुपी पेंढी करून या शेताची मशागत केलीस.पापरुपी तण काढून टाकले. हे शेतकऱ्याच्या रूपातील ईश्वरा! तू त्रिगुणरुपी ( सत्व रज तम)तिफण हाती धरून वेदरुपी चार बैल त्याला जुंपले.माझ्या नाथाच्या शेताला श्रीपांडुरंगाने प्रेमरूपी ओलावा देऊन ते शेत जोपासले.हे पांडुरंगा देहरूपी शेताला प्रेमरूपी ओलावा देऊन त्याचे रक्षण केले.संत नामदेव महाराज म्हणतात,ब्रह्मनामरुपी बीज माझ्या ओटीत बांधून त्याची सर्वत्र पुष्कळ पेरणी केली. या अभंगात देव आणि भक्त यांच्या स्वरूपात कोणताही भेदभाव नाही.त्याकरिता शेतीचे रूपक उपयोगात आणले आहे.देव भक्तासाठी स्वतःला किती कष्टवितो?त्यांच्यासाठी तो स्वतः किती शिणतो? तो भक्ताचे रक्षण करतो.भक्ताला निर्दोष बनवितो.त्याच्याठायी ब्रह्मनामबीजाची पेरणी करतो.अनाथाचा नाथ हा विठ्ठल आहे. भक्तावर त्याचे विलक्षण प्रेम आहे. सतत प्रेमाचा ओलावा भक्ताना तो देत राहतो.त्यांचा सांभाळ करतो असा भक्तवत्सल परमात्मा आहे.असे नामदेव महाराज म्हणतात. थोडक्यात शेती, पेंडवळा पेंडी, कुंदा, काशा, त्रिफणी, सूत्रधार, शेतकरी, बैल जुंपणे, शेत राखणे, बीज, ओटी, दाट बीज

पेरणे इत्यादी शब्द नामदेवांना कृषिसंस्कृतीची असणारी ओळख करून देतात. एका ठीकाणी नामदेव महाराज विठ्ठलाचा महिमा वर्णन करताना आणखी एक कृषी संस्कृती संबंधित संदर्भ देतात. संत नामदेव महाराज यांचे विठ्ठल हे सर्वस्व आहे. भक्तासाठी विठ्ठल कमरेवर हात ठेवून उभा आहे.फक्त जेव्हा आषाढी-कार्तिकीला येतात तेव्हा पंढरपूर अतिशय दणाणून जाते. विठ्ठलावरील भक्ताचे प्रेम वर्णन करताना संत नामदेव कृषी संस्कृती संबंधीत प्रतिमा वापरतात.

*आषाढी कार्तिकी हेचि आम्हा सुगी | शोभा पांडुरंगी धनवटे ||१||*
*संतांचे दर्शनी हेचि पिक जाण | देता अलींगण देह नीवे||२||*
*देह निवे किती नवल सांगावे | जीवाशी दुणावे ब्रह्मनंदा ||३|*
*नामा म्हणे याशी मूळ पांडुरंग| त्याचे नि अव्यंग सुख आम्हा||४|| अ.क्र ३६५*

शेतकऱ्याच्या जीवनामध्ये सुगीला अतिशय महत्त्व असते. शेतकऱ्याचा चरितार्थ सुगीवरच अवलंबून असतो.संत नामदेव महाराजांनी वारकऱ्यांना सुगीची उपमा दिली आहे.आषाढी कार्तिकीला पंढरपुरात खऱ्या अर्थाने भक्तांचे पीक आलेले असते.आपल्या लाडक्या विठ्ठलाचे दर्शन झाल्याने त्यांना फार आनंद होतो.एवढेच नाही तर वारकरी जेव्हा एकमेकांना भेटतात तेव्हा त्यांना खूप आनंद होतो.संत नामदेव महाराजांनी ब्रह्मानंद हा शब्दप्रयोग केला आहे.आणि या आनंदाच्या मुळाशी पांडुरंग आहे,हे सांगायला संत नामदेव महाराज विसरत नाहीत. एका ठिकाणी नाम महात्म्याचे वर्णन करताना संत नामदेव महाराज कृषिविषयक जाणीव व्यक्त करतात.

*शेती बीज नेता थोडे| मोटे आणिताती गाडे||१||*
*एक्या नामे हरि जोडे | फिटे जन्मांचे साकडे||२||*
*बाळे भोळे जन | सर्व तरती कीर्तने||३||*
*नामा म्हणे नेणे मुढ | नाम स्मरावे साबडे||४|| अ.क्र ७५९*

शेतात थोडे बीज पेरले जाते पण त्याचे गाडेच्या गाडे भरून धान्य निर्माण होते. प्रेमाने घेतलेल्या एका नामामुळे हरीची भेट होते आणि जन्ममरणाची संकटे दूर होतात. कीर्तनाच्या माध्यमातून भोळ्याभाबड्या लोकांचाही उद्धार होतो. संत नामदेव महाराज म्हणतात, सुलभ अशा नामाचे स्मरण करावं; परंतु अज्ञानी माणसाला याची जाणीव नसते. शेतीशी निगडित असणाऱ्या प्रक्रियेचे उदाहरण देऊन नाममहात्म्य संत नामदेव महाराज पटवून देतात. एक बीज पेरले की त्यापासून असंख्य धान्य निर्मिती होते ही प्रक्रिया शेतकऱ्याच्या नित्यपरिचयाची आहे हे लक्षात घेऊन संत नामदेव महाराज भगवतप्राप्तीचा, नाममहात्म्याचा सोपा मार्ग शेतकऱ्यांना सुचवितात. एका धान्यापासून असंख्य दाणे ज्याप्रमाणे निर्माण होतात,त्याप्रमाणे एक नाम घेतले की पुण्य फळाला येते अशी संत नामदेव महाराजांची धारणा आहे.अशाप्रकारे संत नामदेव कृषिविषयक जाणिवा लक्षात घेऊन त्याआधारे अध्यात्माची पेरणी करतात.संत नामदेव महाराजांच्या रचनांमध्ये कृष्णलीलांचे वर्णन आढळून येते.कृष्णलीला करताना ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडते. बाळकृष्ण हा सगळ्यांचा आवडीचा विषय संत नामदेव महाराज अतिशय काव्यमय भाषेत वर्णन करतात. नामदेव महाराजांच्या अनेक गौळणी प्रसिद्ध आहेत.त्यातील एका प्रसिद्ध गौळणीत ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडते.

*तूप लावून भाकर करी |वांगे भाजून भरीत करी||१||*
*वर कांद्याची कोशिंबिरी| मला जेऊ घाल||२||*
*आई खडीसाखरेचे खडे| लवकर मला करून दे वडे||३||*
*बाळ स्फुंदस्फुंदोनी रडे|मला जेऊ घाल ||४|| गौ.क्र २४३*

भाकरी, वांग्याचे भरीत, कांदा, कोशिंबीरी, वडे, तूप, इत्यादी पदार्थ ग्रामसंस्कृतीशी अधिक जवळीक साधणारे आहेत. अशाप्रकारे संत नामदेव महाराज ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनतेला भक्तीची गोडी लावण्याचा प्रयत्न करताना दिसतात.

**निष्कर्ष:**

संत ज्ञानेश्वर व संत तुकारामाच्या तुलनेत निसर्ग विषयक किंवा कृषिसंस्कृती विषयक जाणिवा संत नामदेव महाराजांचे अभंगरचनेत अल्प प्रमाणात आढळून येतात. एखादा सिद्धांत पटवून देण्यासाठी सर्वपरिचित असा कृषिविषयक जाणिवेशी संबंधित दृष्टांत नामदेव महाराज देतात.असे असले तरी संत नामदेव महाराजांना निसर्गविषयक किंवा कृषिसंस्कृती विषयी वर्णन करणे हे काही त्यांचे मुख्य प्रयोजन नाही.अध्यात्म निरूपण करताना ओघाने हे संदर्भ आलेले दिसून येतात.आपला सिद्धांत पटवून देण्यासाठी ते दृष्टांत म्हणून त्याचा वापर करतात,हे येथे लक्षात घेणे गरजेचे आहे.परंतु दृष्टांत कडून सिद्धांताकडे जाण्यासाठी भरपूर वाव असल्याचे यानिमित्ताने लक्षात येते.अवघड अध्यात्म शेतीशी संबंधित सर्वपरिचित दृष्टांत देऊन नामदेव महाराज सोपे करून सांगताना दिसतात,असे म्हणणे अतिशयोक्तीचे ठरु नये.

**संदर्भग्रंथसूची:**

*(१) कामत अशोक,'संत नामदेवगाथा', गुरुकुल प्रतिष्ठान पुणे,प्रथम आवृत्ती, २००७.*